ePaper

## संघभूमीत भाजपचा समतेचा दावा, राजकीय दुहेरी भूमिका



वर्ष - 9 । अंक - 163 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 08 फेब्रुवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


पान 2 वरुन...

राज्यभर पुन्हा 'एसटी' बंदचा इशारा!

### पंतप्रधान मोदींनी सांगितले भारत-अमेरिका व्यापार कराराचे मोठे फायदे

# 'विकसित भारता'कडे ऐतिहासिक पाऊल!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारत आणि अमेरिका या दोन जगातील मोठ्या लोकशाही राष्ट्रांनी एका ऐतिहासिक व्यापार कराराच्या पहिल्या टप्प्यावर शिक्कामोर्तब केले आहे. या करारामुळे दोन्ही देशांमधील व्यापारी संबंधांमधील तणाव निवळला असून, भारतासाठी मेक इन इंडिया आणि रोजगाराच्या नव्या संधींची दारे उघडली आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या कराराबद्दल आनंद व्यक्त करत राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे आभार मानले आहेत.**





वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनी दिलेल्या माहितीनुसार, मार्च महिन्यात या करारावर अधिकृत स्वाक्षऱ्या केल्या जातील. या कराराचे दोन मुख्य भाग आहेत. यानुसार ऑगस्ट २०२५ मध्ये रशिया-युक्रेन युद्धामुळे अमेरिकेने भारतीय वस्तूंवर लावलेला २५ टक्के अतिरिक्त शुल्क आता पूर्णपणे हटवला आहे. आता भारतीय वस्तूंवर केवळ १८ टक्के शुल्क आकारले जाईल. भारतही अमेरिकेतील औद्योगिक उत्पादने आणि कृषी मालावरील आयात शुल्क कमी करण्यास तयार झाला आहे.

## "भारत-अमेरिकेसाठी मोठी बातमी"; पंतप्रधान नरेंद्र मोदी

पंतप्रधान मोदींनी 'एक्स'वर पोस्ट करत म्हटले की, हा करार आमच्यातील वाढता विश्वास आणि भागीदारीचे प्रतीक आहे. यामुळे भारताचे मेहनती शेतकरी, उद्योजक, स्टार्टअप आणि मच्छिमार यांच्यासाठी जागतिक बाजारपेठ खुली होईल. विशेषतः महिला आणि तरुणांसाठी हा करार रोजगाराची मोठी संधी घेऊन येईल. भारत आणि अमेरिकेसाठी आनंदाची बातमी! आपल्या दोन महान राष्ट्रांमध्ये एका मध्यवर्ती व्यापार कराराच्या आराखड्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. दोन्ही देशांमधील संबंध अधिक दृढ करण्यासाठी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी दाखवलेल्या वैयक्तिक स्वारस्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. हा करार आपल्यातील वाढता विश्वास आणि भागीदारीचे प्रतीक आहे. यामुळे मेक इन इंडिया अंतर्गत भारतातील कष्टकरी शेतकरी, उद्योजक, लघु-मध्यम उद्योग, स्टार्टअप्स आणि मच्छिमार यांच्यासाठी नव्या संधी उपलब्ध होतील. तरुण आणि महिलांसाठी मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होतील. भारत आणि अमेरिका दोघेही नवनवीन प्रयोगांना प्रोत्साहन देतात. या करारामुळे गुंतवणूक वाढेल आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील भागीदारी अधिक घट्ट होईल. यामुळे जागतिक पुरवठा साखळी अधिक मजबूत होईल आणि जगाच्या आर्थिक विकासाला गती मिळेल. विकसित भारत घडवण्याच्या दिशेने पाऊल टाकत असताना, आम्ही भविष्याचा विचार करणाऱ्या आणि लोकांचे सक्षमीकरण करणाऱ्या अशा जागतिक भागीदारीसाठी कटिबद्ध आहोत.

## भारतीय निर्यातदारांना अच्छे दिन

राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एका कार्यकारी आदेशावर स्वाक्षरी करत शुल्क कपातीचा निर्णय घेतला. भारताने रशियाकडून तेल खरेदी न करण्याचे आणि अमेरिकेसोबतचे सुरक्षा संबंध अधिक मजबूत करण्याचे आश्वासन दिले आहे. भारताने राष्ट्रीय सुरक्षा आणि परराष्ट्र धोरणात अमेरिकेला ठोस सहकार्य करण्याचे पाऊल उचलल्याचे ट्रम्प यांनी मान्य केले आहे.

## भारतात कोणत्या वस्तू स्वस्त होणार?

भारताने अमेरिकेतील खाद्य आणि कृषी उत्पादनांवर शुल्क कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे सुका मेवा आणि ताजी फळे, सोयाबीन तेल, मद्य, पशुखाद्यासाठी लागणारे लाल ज्वार आणि इतर औद्योगिक वस्तू यांच्या किमती कमी होण्याची शक्यता आहे.



## डोनाल्ड ट्रम्प यांनी का मागे घेतले शुल्क?

राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एका कार्यकारी आदेशावर स्वाक्षरी करत शुल्क कपातीचा निर्णय घेतला. भारताने रशियाकडून तेल खरेदी न करण्याचे आणि अमेरिकेसोबतचे सुरक्षा संबंध अधिक मजबूत करण्याचे आश्वासन दिले आहे. भारताने राष्ट्रीय सुरक्षा आणि परराष्ट्र धोरणात अमेरिकेला ठोस सहकार्य करण्याचे पाऊल उचलल्याचे ट्रम्प यांनी मान्य केले आहे.

# राज्यभर पुन्हा ‘एसटी’ बंदचा इशारा!

## मासिक भत्त्यावर निर्णय नाही; कर्मचारी संघटना आक्रमक

महाईन्यूज । पुणे

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) कर्मचाऱ्यांच्या मासिक भत्त्याबाबत राज्य सरकारने तातडीने निर्णय घेतला नाही, तर राज्यभर एसटी बंद करण्याचा इशारा कर्मचारी संघटनांनी दिला आहे.**

### वर्गनिहाय स्थानिक पूरक भत्त्याचे दर जाहीर

वेतन मर्यादा व श्रेणीनुसार स्थानिक पूरक भत्त्याचे दर निश्चित करण्यात आले आहेत. मासिक वेतन ३,००० रुपयांपेक्षा कमी असलेल्या कर्मचाऱ्यांना अ-१ श्रेणीसाठी ९० रुपये, अ श्रेणीसाठी ६५ रुपये, ब-१ श्रेणीसाठी ४५ रुपये तर ब-२ श्रेणीसाठी २५ रुपये पूरक भत्ता दिला जाणार आहे.

३,००० ते ४,४९९ रुपये मासिक वेतन असलेल्या कर्मचाऱ्यांना अ-१ श्रेणीत १२५ रुपये, अ श्रेणीत ९५ रुपये, ब-१ श्रेणीत ६५ रुपये आणि ब-२ श्रेणीत ३५ रुपये भत्ता मिळणार आहे.

४,५०० ते ५,९९९ रुपये मासिक वेतन असणाऱ्यांसाठी अ-१ श्रेणीत २०० रुपये, अ श्रेणीत १५० रुपये, ब-१ श्रेणीत १०० रुपये तर ब-२ श्रेणीत ६५ रुपये पूरक भत्ता निश्चित करण्यात आला आहे.

तर ६,००० रुपये किंवा त्याहून अधिक मासिक वेतन असलेल्या कर्मचाऱ्यांना अ-१ श्रेणीसाठी ३०० रुपये, अ श्रेणीसाठी २४० रुपये, ब-१ श्रेणीसाठी १८० रुपये आणि ब-२ श्रेणीसाठी १२० रुपये स्थानिक पूरक भत्ता दिला जाणार आहे.



> एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना शहराच्या श्रेणी आणि वर्गनिहाय मासिक वेतनानुसार मासिक पूरक भत्ता ठरवून दिला आहे. मात्र, अनेक शहरांतील कर्मचाऱ्यांना नियमाप्रमाणे मासिक भत्ता दिला जात नसून, याबाबत वारंवार मागणी करण्यात आली आहे. याबाबत राज्य सरकारकडून तातडीने निर्णय घेतला नाही, तर राज्यात एसटी बंद आंदोलन करण्यात येईल.
>
> – दिलीप परब, सचिव, महाराष्ट्र राज्य एसटी कामगार संघटना

केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार राज्य सरकारच्या अर्थ विभागाने ११ डिसेंबर १९९८ रोजी एसटी महामंडळातील आगारांची शहरनिहाय अ १, अ, ब १, ब २ अशी वर्गवारी केली.




त्यानुसार ‘अ १’ वर्गवारीतील एसटी कर्मचाऱ्यांना दरमहा ३०० रुपये, ‘अ’ वर्गातील कर्मचाऱ्यांना सहा हजार रुपयांपेक्षा जास्त मूळ वेतन असल्यास कर्मचाऱ्यांना २४० रुपये मासिक भत्ता देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार पुणे विभागातील कर्मचारी ‘अ’ वर्गात मोडत असल्याने त्यांना प्रतिमाह २४० रुपये मासिक भत्ता मिळणे अनिवार्य आहे. मात्र, गेल्या दोन दशकांपासून कर्मचाऱ्यांना जुन्या दरानुसार प्रतिमाह ६५ रुपये मासिक भत्ता देण्यात येत आहे, असा आरोप आरोप महाराष्ट्र राज्य एसटी कामगार संघटनेचे सचिव दिलीप परब आणि सागर दिघे यांनी केला.

ते म्हणाले, ‘छत्रपती संभाजीनगर ‘ब’ वर्गात येत असून, ब २ या श्रेणीतील शहरातील एसटी कर्मचाऱ्यांना दर महिना १२० ऐवजी २५ रुपये भत्ता दिला जात आहे. राज्य सरकारच्या परिपत्रकाचा आधार घेऊन आतापर्यंत कर्मचाऱ्यांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे.

या बाबत छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, पुणे आणि राज्यात अनेक ठिकाणच्या कर्मचाऱ्यांना राज्य सरकारबरोबर पत्रव्यवहार करून मासिक वेतन आणि शहराच्या श्रेणी आणि वर्गवारीनुसार ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणे पूरक भत्ता देण्याची मागणी केली आहे. मात्र, राज्य सरकारकडून अद्याप कुठलेच उत्तर प्राप्त झाले नसून, निर्णयाबाबतही कोणताही विचार केलेला नाही.’

# मुंबई-पुणे मिसिंग लिंकवर धोकादायक वाहनांना नो-एंट्री

महाईन्यूज । पुणे

**मुंबई – पुणे द्रुतगती महामार्गावरील गॅस टँकर अपघात आणि त्यानंतर झालेली ३२ तासांची कोंडी यामुळे वाहतूक व्यवस्थापन, आपत्ती व्यवस्थापनावर प्रश्न उपस्थित केला जात आहे. तर प्रवासी-वाहनचालकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. वायू गळतीमुळे कोणतीही मोठी दुर्घटना घडण्याची भीती अपघातानंतर होती. पण येत्या काळात मिसिंग लिंकमुळे महामार्गावरील प्रवास अधिक सुरक्षित होणार असल्याचा दावा केला जात आहे.**



### १ मेपासून मिसिंग लिंक सेवेत

मिसिंग लिंकचे आतापर्यंत ९५ टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित कामे एप्रिलच्या मध्यावर पूर्ण केली जातील. त्यानंतर फिनिशिंगची कामे सुरु करून मार्गिकेसाठीच्या आवश्यक त्या चाचण्या पूर्ण करण्यात येतील. त्यानंतर १ मे रोजी मिसिंग लिंक वाहतूक सेवेत दाखल होईल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

मिसिंग लिंकवर कोणत्याही प्रकारची स्फोटके, ज्वलनशील पदार्थ वाहून नेणाऱ्या वाहनांना प्रवेश बंदी असणार आहे. वाहतुकीच्या नियमानुसार अशा वाहनांना मिसिंग लिंकवर प्रवेश बंदीची तरतूद करण्यात आली आहे.

मुंबई - पुणे प्रवास अतिजलद करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) अंदाजे ९४ किमीचा मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग बांधला. हा महामार्ग २००२ मध्ये वाहतूक सेवेत दाखल झाला असून या महामार्गावरून प्रवास करण्यासाठी पथकर मोजावा लागतो. आजघडीला हा महामार्ग राज्यातील सर्वात महत्त्वाचा आणि वर्दळीचा महामार्ग आहे. या महामार्गावरून दररोज ७५ हजार वाहने धावतात. हा महामार्ग आता वाढत्या वाहनांना सामावून घेण्यासाठी अपुरा पडू लागल्याने महामार्गावरील वाहतूक कोंडीत वाढ होत आहे.

मंगळवार सायंकाळी ५ वाजता झालेला गॅस टँकर अपघात आणि त्यानंतर झालेल्या ३२ तासांच्या वाहतूक कोंडीमुळे वाहनचालक-प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. अशावेळी मिसिंग लिंक प्रकल्पाची गरज अधोरेखित झाली आहे. मिसिंग लिंक प्रकल्प वेळेत पूर्ण होऊन वाहतूक सेवेत दाखल झाला असता तर ३२ तासांची वाहतूक कोंडी टळली असती अशी चर्चा सुरू आहे. मिसिंग लिंकमुळे महामार्गावरील घाटाचा प्रवास टळणार असून ६ किमीने प्रवासाचे अंतर कमी होणार आहे. प्रवास कालावधीत ३० मिनिटे वाचणार आहेत. तर दुसरीकडे अत्यंत महत्त्वाची बाब म्हणजे प्रवास सुरक्षित होणार आहे.

खोपोली – कुसगाव अशी १९.८० किमीची नवी मार्गिका एमएसआरडीसीकडून बांधली जात असून ही मार्गिका आता मिसिंग लिंक म्हणून ओळखली जाऊ लागली आहे. ६६९५ कोटी रुपये खर्चाची ही मार्गिका आतापर्यंत पूर्ण होऊन वाहतूक सेवेत दाखल होणे अपेक्षित होते. मात्र अनेक कारणाने कामाला विलंब झाल्याने हा प्रकल्प लांबणीवर पडला आहे. मिसिंग लिंक वाहतूक सेवेत येण्याची प्रतीक्षा आहे. मिसिंग लिंक वाहतूक सेवेत दाखल झाली असती तर ३२ तासांची वाहतूक कोंडी टळली असती. प्रवासासाठी पर्यायी मार्ग उपलब्ध झाला असता. त्यामुळे आता मिसिंग लिंक प्रकल्प वेगाने पूर्ण करून वाहतूक सेवेत दाखल करण्याची मागणी वाहनचालक-प्रवाशांकडून होत आहे.


राज्य सरकारनेही हा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आदेश एमएसआरडीसीला दिले आहे. त्यानुसार एमएसआरडीसीने कामाला वेग दिला आहे. येत्या काही महिन्यांतच ही मार्गिका सेवेत दाखल केली जाणार आहे. ही मार्गिका सेवेत दाखल झाल्यास ३० मिनिटांची बचत होणार आहेच, पण त्याचबरोबर प्रवास सुरक्षितही होणार आहे. या मार्गिकेवरील १९ किमीच्या प्रवासात कोणतीही वायू गळतीसाठी घटना घडण्याची, वायू गळती वा स्फोटकांमुळे दुर्घटना घडण्याची भीती नाही. कारण या मार्गिकेवर स्फोटके आणि ज्वलनशील पदार्थ वाहून नेणाऱ्या वाहनांना प्रवेश बंदी असणार आहे.

# दुःखद प्रसंगीही जपली सामाजिक बांधिलकी!

## धीरज चुत्तर यांच्या अवयवदानातून सहा जणांना नवे जीवन

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**भोसरीतील आळंदी रोड परिसरात अनेक वर्षांपासून आदिनाथ प्रोव्हिजन स्टोअर्स नावाने किराणा व्यवसाय करणारे प्रतिष्ठित व्यापारी धीरज सुभाष चुत्तर (वय ३८) यांचे ब्रेन डेड झाल्याने दुःखद निधन झाले. मात्र, मृत्यूनंतरही चुत्तर कुटुंबीयांनी सामाजिक बांधिलकी जपत धीरज यांचे अवयवदान करून एका सहा वर्षांच्या लहान मुलासह एकूण सहा गरजू रुग्णांना जीवनदान दिले आहे. या निर्णयामुळे दुःखाच्या क्षणीही मानवतेचा दीप उजळून निघाला आहे.**




अत्यंत मनमिळावू, हसतमुख स्वभावाचे धीरज चुत्तर व त्यांचे कुटुंब भोसरी परिसरात सहृदयी कुटुंब म्हणून ओळखले जाते. मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी रोजी चक्कर येऊन पडल्याने धीरज यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. पुढील तपासण्या व सुयोग्य उपचारासाठी त्यांना पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र मेंदूच्या गंभीर दुखापतीमुळे सर्वतोपरी उपचार करूनही शनिवारी, दि. ७ फेब्रुवारी रोजी डॉक्टरांनी त्यांना ब्रेन डेड घोषित केले.

या दुर्दैवी घटनेने संपूर्ण चुत्तर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असतानाही, डॉक्टरांच्या सल्ल्याने आणि सामाजिक भान जपत कुटुंबीयांनी अवयवदानाचा धाडसी व प्रेरणादायी निर्णय घेतला. धीरज यांच्या मृत्यूपश्चात लिव्हरचा काही भाग, दोन्ही किडन्या आणि दोन्ही नेत्र दान करण्यात आले. यामधील लिव्हरचा काही भाग सहा वर्षांच्या एका लहान मुलासाठी जीवनदायी ठरला, तर उर्वरित अवयवांमुळे आणखी पाच रुग्णांना नवे जीवन मिळणार आहे.

या सामाजिक बांधिलकीबद्दल भोसरी व परिसरातून चुत्तर कुटुंबीयांचे सर्वत्र कौतुक होत असून, नागरिक त्यांच्या दुःखात सहवेदना व्यक्त करत आहेत. या कठीण काळात भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली भोसरी प्रभाग क्रमांक ५ चे नगरसेवक सागर गवळी यांनी चुत्तर कुटुंबीयांना मोलाचा आधार दिला. तसेच मुख्यमंत्री रुग्ण सहायता विभागाचे विशेष साहाय्य लाभले अशी माहिती चुत्तर कुटीबीयांनी दिली.

ऐन तारुण्यात अचानक मृत्यू ओढवूनही स्व. धीरज चुत्तर यांच्या आठवणी अवयवदानामुळे इतरांच्या जीवनात जिवंत राहतील, अशी भावना व्यक्त केली जात आहे. चुत्तर कुटुंबीयांनी घेतलेला हा निर्णय समाजासाठी आदर्श ठरणारा असून, अवयवदानाबाबत जनजागृतीसाठी तो प्रेरणादायी ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# चोरट्यांचा पर्दाफाश! पोलिसांकडून १३ मोटारसायकली जप्त

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या उत्तर महाळुंगे एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशनच्या तपास पथकाने वाहन चोरी करणाऱ्या एका सक्रिय टोळीचा पर्दाफाश केला आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलिसांनी निलेश राजु मंडलीक (वय २४) आणि त्याचा साथीदार संदिप साहेबराव सोनवणे (वय २५) या दोन आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत तब्बल ५ लाख ५० हजार रुपये किमतीच्या एकूण १३ मोटारसायकली जप्त करण्यात आल्या आहेत. या मोटारसायकली चाकण एमआयडीसी आणि आसपासच्या परिसरातून चोरण्यात आल्या होत्या.**



पिंपरी चिंचवड परिसरातील मोटारसायकल चोरीच्या वाढत्या गुन्ह्यांवर आळा घालण्यासाठी पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी विशेष सूचना दिल्या होत्या. त्यानुसार अपर पोलीस आयुक्त बसवराज तेली व पोलीस उप आयुक्त परिमंडळ ४, श्रीमती श्वेता खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली क्राईम मॅपिंग, नाकाबंदी आणि तांत्रिक तपासाचे आधारे तपास सुरू होता.

उत्तर महाळुंगे एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशनच्या हद्दीतील एका गुन्ह्याच्या तपासादरम्यान, सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपी आंबेठाण चौक, चाकण येथे राहत असल्याची माहिती पोलीस अंमलदार शुभम खंडागळे यांना मिळाली. पोलिसांनी तात्काळ सापळा रचून निलेश राजु मंडलीक (वय २४ वर्षे, रा. आंबेठाण चौक, चाकण) याला ताब्यात घेतले. उत्तर महाळुंगे एमआयडीसी पोलिसांनी



वाहनचोरी प्रकरणात दोघांना अटक केली आहे. यातील मुख्य आरोपीचे नाव निलेश राजु मंडलीक असे आहे.

पोलीस तपासात निष्पन्न झालेल्या माहितीनुसार, त्याचा सहआरोपी संदिप साहेबराव सोनवणे (वय २५ वर्षे), असून, तो मूळचा चापडगाव, तालुका कर्जत, जिल्हा आहिल्यानगर येथील रहिवासी आहे. या दोघांनी मिळून परिसरातून १३ मोटारसायकली चोरल्याचे कबूल केले आहे.

तपासामध्ये निलेश मंडलीक याने आपला साथीदार संदीप सोनवणे याच्या मदतीने चाकण एमआयडीसी व आसपासच्या परिसरातून एकूण १३ मोटारसायकली चोरल्याची कबुली दिली. यापैकी काही मोटरसायकलींची विक्री केल्याचेही निष्पन्न झाले. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून विविध पोलीस स्टेशनमधील (उत्तर महाळुंगे, दक्षिण महाळुंगे, शिक्रापूर, करमाळा, चुत:शृंगी, चाकण) गुन्ह्यातील मोटारसायकली हस्तगत करण्यात आल्या आहेत.

पोलीस सध्या आरोपींची पोलीस कोठडी रिमांड घेऊन पुढील तपास करत आहेत. या कामगिरीमुळे पिंपरी-चिंचवडमधील वाहन चोरीच्या अनेक गुन्ह्यांची उकल झाली आहे.



## भूमिका

# द्रुतगती की द्रुतकोंडी?



**राज्यातीलच नव्हे, तर देशातील सर्वांत वर्दळीचा मार्ग म्हणून पुणे–मुंबई द्रुतगती महामार्गाची ओळख आहे. पुणे आणि मुंबई या दोन महत्त्वाच्या शहरांना जोडणारा हा वेगवान मार्ग तब्बल 30 ते 35 तास ठप्प राहावा, ही घटना अभूतपूर्वच म्हणावी लागेल.**

2002 मध्ये वाहतुकीसाठी खुला झालेल्या या महामार्गामुळे प्रवासाचा कालावधी मोठ्या प्रमाणात कमी झाला. पूर्वी जुन्या पुणे–मुंबई राष्ट्रीय महामार्गावरून होणारा वेळखाऊ आणि किचकट प्रवास द्रुतगती महामार्गामुळे अडीच ते तीन तासांत शक्य झाला. वेळ व खर्चाची बचत झाल्याने या मार्गावरून प्रवास करण्याला नागरिकांनी प्राधान्य दिले. आजघडीला या महामार्गावरून दररोज सुमारे 75 हजारांहून अधिक वाहने धावतात. गेल्या आठ-दहा वर्षांत वाहनसंख्या झपाट्याने वाढली. परिणामी, छोटे-मोठे अपघात, अवजड वाहने बंद पडणे आणि त्यातून निर्माण होणाऱ्या वाहतूक कोंड्यांचे प्रमाणही वाढले. मात्र, तब्बल 36 तास संपूर्ण वाहतूक ठप्प होण्याची घटना यापूर्वी कधीच घडली नव्हती. मंगळवारी सायंकाळी खोपोली हद्दीतील आडोशी बोगद्याजवळ तीव्र वळण आणि उतारावर प्रोपेलिन वायू वाहतूक करणारा गॅस टँकर उलटला. प्रोपेलिन हा अत्यंत ज्वलनशील हायड्रोकार्बन वायू असून तो हवेपेक्षा जड असल्याने बंद जागेत साचण्याचा धोका अधिक असतो. टँकर पलटी झाल्यानंतर गॅस गळती सुरू झाल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने तात्काळ वाहतूक बंद करणे अपरिहार्य ठरले. परिणामी, दोन्ही बाजूंनी 25 ते 30 किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. या घटनेचा सर्वाधिक फटका प्रवाशांना बसला. अनेक वाहने 15 ते 20 तासांहून अधिक काळ एकाच ठिकाणी अडकून पडली. अन्न-पाण्यावाचून लोकांची अवस्था झाली. लहान मुलांचे रडणे, वृद्धांची प्रकृती, महिलांची कुचंबणा—या साऱ्यांनी परिस्थिती अधिक भयावह झाली. रात्रीच्या अंधारात तर हालअपेष्टांना पारावर उरला नाही. पाण्याचा एक थेंब महाग झाला, ही वस्तुस्थिती होती. हे संकट गुरुवारची पहाट उजाडेपर्यंत दूर होऊ शकले नाही, हे आपल्या आपत्कालीन व्यवस्थेचे लखलखीत अपयश दर्शवते. द्रुतगती महामार्गावर दररोज रसायने व वायू वाहतूक करणारे असंख्य टँकर धावत असतात. मात्र, अशा धोकादायक वाहनांची किंवा चालकांची स्वतंत्र व काटेकोर तपासणी केली जाते का, हा गंभीर प्रश्न आहे. गॅस गळती रोखण्यासाठी आवश्यक तज्ज्ञ पथकांची कमतरता या घटनेतून स्पष्ट झाली. आडोशी परिसर आधीपासूनच 'मृत्यूमार्ग' म्हणून ओळखला जातो. अवजड वाहने घाट उतरताना वेगमर्यादेचे उल्लंघन करतात. अवजड वाहनांसाठी 50 किमी प्रतितास वेगमर्यादा असताना, इंधन बचतीसाठी न्यूट्रल गिअरमध्ये वाहन सोडण्याचे प्रकारही घडतात. तीव्र उतार व वळणांवरून यामुळेच वाहने अनियंत्रित होऊन अपघात होतात. मंगळवारचा अपघातही त्याच साखळीतील एक दुवा आहे. द्रुतगती महामार्ग हा केवळ प्रवासाचा नव्हे, तर राज्याच्या अर्थकारणाचा कणा आहे. इतकी दीर्घ वाहतूक कोंडी म्हणजे आर्थिक व्यवहारांवरही मोठा परिणाम. त्यामुळे अशा घटना सातत्याने परवडणाऱ्या नाहीत. पर्यायी मार्ग, विशेष आपत्कालीन वाहतूक आराखडा आणि सुसज्ज तज्ज्ञ पथके तातडीने उभारणे गरजेचे आहे. कर्जत–शिरूर महामार्गाचा पर्याय सुचविण्यात आला होता, मात्र तो अहवाल अद्याप धूळ खात पडून असल्याचे बोलले जाते.

## प्रासंगिक »

### मित्र

***एकदा एक मुंगी आपले खाद्य शोधत फिरत असता कोशातून नुकताच एक किडा बाहेर पडलेला तिला दिसला. कोशातून बाहेर पडलेले त्याचे पाय तो हळूहळू हालवीत होता.***

ते पाहून मुंगी म्हणाली, 'अरेरे, काय ही तुझी स्थिती ? मला वाटेल तिकडे फिरता येतं. पण तुला या कोशात बंदीवान होऊन दिवस काढावे लागतात. तेव्हा तुझ्या व माझ्या स्थितीत फारच अंतर आहे असं म्हटले पाहिजे.' यावर किडा काहीच बोलला नाही. पुढे काही दिवसांनी ती मुंगी पुनः तेथे गेली असता त्या किड्याचे फक्त कवच मात्र तेथे पडले असून तो किडा कोठेतरी निघून गेला आहे असे तिला दिसते. ती इकडे तिकडे फिरत आहे तोच एक सुंदर पतंग आपल्या पंखांनी तिला वारा घालत असताना तिला दिसला. तो तिला म्हणाला, 'अग, त्या दिवशी बंदिवान म्हणून तू माझी कीव करीत होतीस, माझ्यापेक्षा तुझी स्वतःची स्थिती बरी असं म्हणत होतीस, तोच कोशातला किडा मी आहे हे लक्षात घे.

तात्पर्य – संकटात असलेला माणूस पुनः कधीही वर डोके काढणार नाही अशा समजुतीने त्याचा उपहास करून त्याच्याजवळ स्वतःच्या वैभवाबद्दल बढाई मारणे हा मूर्खपणा होय.

अमेरिकेबरोबरचा तणाव संपुष्टात येणे भारतासाठी किती आवश्यक होते, हे डोनाल्ड ट्रम्प आणि नरेंद्र मोदी यांच्यातील नव्या समेटाच्या वृत्तानंतर उसळलेल्या बाजार निर्देशांकावरून स्पष्ट झाले.

# आर्थिक गरज, राजनैतिक कसोटी




अमेरिकेने भारतावर लादलेले अतिरिक्त आयातशुल्क मागे घेतल्याची घोषणा होताच बाजारात सकारात्मक वातावरण निर्माण झाले, रुपयाही सावरला. त्यामुळे अमेरिकेशी संबंध सुधारणे ही केवळ राजनैतिक नव्हे, तर थेट आर्थिक गरज होती, हे पुन्हा अधोरेखित झाले. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतलेली पावले स्वागतार्ह असून त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करणे योग्य ठरते. १२ फेब्रुवारीस ट्रम्प-मोदी यांच्या व्हाइट हाऊस भेटीला एक वर्ष पूर्ण होईल. ट्रम्प अध्यक्ष झाल्यानंतर त्यांची भेट घेणारे मोदी हे पहिले बड्या देशाचे प्रमुख होते. मात्र त्या भेटीतून अपेक्षित लाभ मिळाला नाही.

उलट, ट्रम्प यांनी भारताशी काहीसे अंतर राखले आणि 'पहलगाम'नंतर हे अंतर अधिकच वाढले. भारत-पाकिस्तान संघर्षाबाबत आपणच मध्यस्थी केल्याचा दावा ट्रम्प यांनी वारंवार केला. त्यावर भारताकडून मौन राहिले. यावेळी मात्र पंतप्रधान मोदी यांनी समाजमाध्यमांद्वारे ट्रम्प यांचे आभार मानत समेटाचा मार्ग स्वीकारला. वैयक्तिक अहंकारापेक्षा राष्ट्रीय हित महत्त्वाचे, ही भूमिका कृतीतून दिसून आली. तथापि, या कराराचा अधिकृत तपशील अद्याप भारत सरकारकडून समोर आलेला नाही.

उपलब्ध माहिती प्रामुख्याने ट्रम्प यांच्याच वक्तव्यांवर आधारित आहे. त्यामुळे संशयाची छाया निर्माण होते. विशेषतः रशियन तेल खरेदीबाबत ट्रम्प यांनी केलेले दावे चिंताजनक आहेत. भारत आपल्या एकूण तेल गरजेपैकी सुमारे ३५ टक्के तेल रशियाकडून घेतो. स्वस्त दरात मिळणारे हे तेल आपल्या अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाचे आहे. ते सोडण्याचा निर्णय घेतला असल्याचा दावा खरा असेल, तर त्याबाबत स्पष्टता आवश्यक आहे.

याशिवाय अमेरिकेच्या कृषिमंत्री ब्रुक रोलीन्स यांनी केलेले निवेदनही गंभीर आहे. या करारामुळे अमेरिकी शेतकऱ्यांना भारतीय बाजारपेठ खुली होईल, असे त्या ठामपणे सांगतात. हे खरे ठरल्यास भारतीय शेतकऱ्यांसाठी मोठे आव्हान उभे राहू शकते. अमेरिकी दुग्धजन्य उत्पादने, जनुकीय पिके आणि स्वस्त शेतमाल यांचा शिरकाव देशांतर्गत शेतीवर परिणाम करू शकतो. ट्रम्प यांनी भारत ५० हजार कोटी डॉलर्सची उत्पादने अमेरिकेकडून खरेदी करेल, असेही जाहीर केले आहे.

म्हणूनच, जे झाले त्याचे स्वागत करतानाच या करारातील भारतीय हितसंबंध स्पष्ट करणे सरकारची जबाबदारी आहे. मनमोहन सिंग यांच्या काळातील अणुकराराप्रमाणेच, दीर्घकालीन राष्ट्रीय हित लक्षात घेऊनच या कराराचे मूल्यमापन झाले पाहिजे.

## ।। अभंगवाणी ।।



अहिल्या द्रौपदी सीता तारा चारी।
मुख्य मंदोदरी पतिव्रता ॥१॥

नामें घेतां त्यांची वाणी हे पवित्र ।
होय कुळगोत्र उद्धरण ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मुंबईच्या उपमहापौरपदाचा कार्यकाळ अध्यावर

## ‘महायुती सरकार’चा नवा फॉर्म्युला; संजय घाडींना सव्वा वर्षच संधी

**महाईन्यूज । मुंबई**

**भाजप – शिवसेना (शिंदे) महायुतीने मुंबईच्या महापौर आणि उपमहापौर पदासाठी अनुक्रमे भाजपच्या नगरसेविका रितू तावडे आणि शिवसेनेचे (शिंदे) नगरसेवक संजय घाडी यांना उमेदवारी जाहीर केली. मात्र उपमहापौर पदाचा कार्यकाळ अडीचऐवजी सव्वावर्ष करण्यात येत असल्याची घोषणाही उमेदवारी जाहीर करताना स्पष्ट करण्यात आले.**



केवळ अन्य काही नगरसेवकांना उपमहापौर पदी विराजमान होण्याची संधी मिळावी म्हणून हा निर्णय घेण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले.

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी १५ जानेवारी रोजी मतदान झाले आणि दुसऱ्याच दिवशी १६ जानेवारी रोजी मतमोजणीअंती निकाल जाहीर करण्यात आला. निवडणुकीत भाजपचे ८९, शिवसेनेचे (ठाकरे) ६५, शिवसेनेचे (शिंदे) २९, काँग्रेसचे २४, एआयएमआयएमचे आठ, मनसेचे सहा, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) तीन, समाजवादी पार्टी दोन, तर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) एक असे एकूण २२७ उमेदवार विजयी झाले. भाजप सर्वाधिक संख्याबळ असलेला पक्ष ठरला आहे. भाजप – शिवसेना (शिंदे) महायुतीचे संख्याबळ ११८ वर पोहोचले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) नवनिर्वाचित एकमेव नगरसेवकाने शिवसेनेला (शिंदे) समर्थन दिल्यामुळे महायुतीचे संख्याबळ ११९ झाले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसची (अजित पवार) भूमिका अद्याप स्पष्ट नाही. त्याच वेळी शिवसेना (ठाकरे) – मनसे युतीचे संख्याबळ ७१ वर पोहोचले आहे. काँग्रेसने युतीला पाठिंबा दिला तरी युतीचे संख्याबळ ९५ वर पोहोचेल. एआयएमआयएम, समाजवादी पार्टी यांनी शिवसेना (ठाकरे) – मनसे युतीला पाठींबा दिला तरी संख्याबळ १०५ वर पोहोचू शकेल. त्यामुळे शिवसेना (ठाकरे) – मनसे युतीला मुंबई महानगरपालिका सभागृहात विरोधकांची भूमिका पार पाडावी लागणार आहे.

गेले अनेक दिवस मुंबईचा महापौर कोण होणार यावरून उलटसुलट चर्चा सुरू होती. मुंबईचे महापौर पद महिला खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित झाल्यामुळे अनेक नगरसेविकांची नावे महापौर पदासाठी चर्चेत होती. मात्र भाजप – शिवसेना (शिंदे) महायुतीने शनिवारी या चर्चेला पूर्णविराम दिला. मुंबईच्या महापौर आणि उपमहापौर पदासाठी महायुतीने शनिवारी उमेदवारी अर्ज भरला.

महायुतीने महापौर पदासाठी भाजपच्या नगरसेविका रितू तावडे यांना, तर शिवसेनेचे (शिंदे) नगरसेवक संजय घाडी यांना उमेदवारी देण्यात आली. मात्र उपमहापौर पदाचा कार्यकाळ सव्वा वर्षाचा निश्चित करण्यात आल्याचे शिवसेनेचे (शिंदे) सरचिटणीस राहुल शेवाळे यांनी उमेदवारी जाहीर करताना स्पष्ट केले. पक्षातील इतर नगरसेवकांनाही उपमहापौर पदाची संधी मिळावी यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे राहुल शेवाळे यांनी ‘लोकसत्ता’शी बोलताना स्पष्ट केले.

यापूर्वी महापौर आणि उपमहापौरांचा कार्यकाळ अडीच वर्षांचा होता. मुंबई महानगरपालिका निवडणुकीनंतर अडीच वर्षांनी महापौर आणि उपमहापौर पदासाठी निवडणूक होत होती. परंतु आता उपमहापौर पदासाठी दर सव्वा वर्षाने निवडणूक घ्यावी लागणार आहे. शिवसेनेचे (शिंदे) उमेदवार संजय घाडी यांना सव्वावर्ष उपमहापौरपद भूषवता येणार आहे. त्यानंतर अन्य नगरसेवकाला संधी मिळू शकेल.

# संघभूमीत भाजपचा समतेचा दावा, राजकीय दुहेरी भूमिका

**महाईन्यूज । नागपूर**

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय असलेल्या नागपुरात भाजपने महापालिकेत सत्तेचे वाटप करताना सोशल इंजिनिअरिंगचा प्रयोग करून समतेचा संदेश देण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याच वेळी महापौरपदाच्या घोषणेनंतर सभागृहात ‘जय श्रीराम’ च्या घोषणाही देण्यात आल्या. एकीकडे सामाजिक संदेश आणि दुसरीकडे कट्टर हिंदुत्ववाद दर्शवण्याचा प्रयत्न यातून भाजपने दुहेरी संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे.**



नागपूर ही केवळ विदर्भाची राजधानी नाही, तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारविश्वाचे केंद्र आहे. त्यामुळे येथे घडणारी प्रत्येक राजकीय हालचाल ही स्थानिक राजकारणापुरती मर्यादित राहत नाही. भाजपने नागपूर महापालिकेत सत्तावाटप करताना केलेले तथाकथित ‘सोशल इंजिनिअरिंग’ हे त्याचेच उदाहरण म्हणावे लागेल.

१५१ सदस्यीय महापालिकेत १०२ जागा जिंकून भाजपने महापालिकेत निर्विवाद बहुमत मिळवले. पक्षावर संघाची पकड आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे दोन्ही संघाचे स्वंयसेवक आहेत, संघाचे मुख्यालय नागपूरमध्ये आहे. ऐवढेच नव्हे तर महापौरपद सुद्धा खुल्या प्रवर्गातील महिलेसाठी राखीव ठरलेले. असे सर्व असताना नागपूरचा महापौर संघ विचाराचाच असेल ,अशी स्वाभाविक अपेक्षा होती. त्याच अनुषंगाने काही नावेही चर्चेत होती. मात्र भाजपने सोशल इंजिनिअरिंगचा प्रयोग केला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना याचे श्रेय जाते.

महापालिकेतील सत्तेची चार प्रमुख पदे वाटप करताना समाजाच्या सर्व प्रमुख घटकांचा विचार करण्यात आला.खुल्या प्रवर्गासाठी राखीव महापौरपदावर प्रत्यक्षात ओबीसी प्रवर्गातील नीता ठाकरे यांची निवड करून भाजपने सामाजिक समतेचा संदेश देण्याचा प्रयत्न केला. उपमहापौरपद वाल्मिकी समाजाच्या प्रतिनिधीकडे आणि स्थायी समितीचे अध्यक्षपद खुल्या प्रवर्गातील महिलेकडे देत समाजातिल सर्व घटकांना सामावून घेण्याचे चित्र उभे करण्यात आले. हा निर्णय केवळ सामाजिक न्यायाचा आहे, असे सरधोपटपणे म्हणता येणार नाही. कारण महापौर निवडीनंतर सभागृहात घुमलेले ‘जय श्रीराम’चे नारे हे भाजपचे मूळ हिंदुत्ववादी अधिष्ठान अजूनही केंद्रस्थानी असल्याची जाणीव करून देणारे ठरले. म्हणजेच समतेचा प्रयोग हा राजकीय व्यवस्थापनाचा भाग असून, वैचारिक भूमिकेत फारसा बदल झालेला नाही, हे यातून स्पष्ट होते. २०२२ मध्ये महापौरपद खुल्या गटासाठीच होते तर मग आता पुन्हा त्याच गटासाठी कसे राखीव झाले. आरक्षण सोडत नियमावलीत वेळेवर बदल का करण्यात आले. नियमानुसार नागपूरचे महापौरपद हे मागासवर्गीयांसाठी (एससी) राखीव असणे अपेक्षित आहे. पण तसे झाले नाही. मग सर्वसाधारण प्रवर्गाच्या जागेवर ओबीसी महापौर केला तर बिघडले कुठे ? . ओबीसी हा भाजपचा मताधार आहे, अशी बाजू मांडली जाते. . या दोन्ही टोकांच्या भूमिकांमध्ये भाजपने ओबीसी महापौराचा मार्ग स्वीकारला, यामागे भावनिक नव्हे तर निव्वळ गणिती राजकारण आहे हे स्पष्ट होते.

### भाजपमध्ये मतभेद

सर्वसाधारण महिला गटासाठी राखीव असलेले महापौरपद याच गटाला मिळणे अपेक्षित असताना व त्यासाठी उमेदवार ‘ ठरलेला’ असताना त्या पदावर इतरांना म्हणजे इतर प्रवर्गाला संधी देणे या मुद्यावर भाजपमधील अंतर्गत मतभेदही पुढे आले. सोडतीव्दारे निघालेल्या आरक्षणाला वाटाण्याच्या अक्षता लावणे चुकीचे , इतर वेळी आरक्षण सोडतीनुसारच उमेदवार निवडला जात असेल तर सर्वसाधारण गटावर अन्याय का ? असा सवाल असा स्वत:ला मुख्यमंत्री समर्थक मानणाऱ्या गटाचाआहे, तर दुसऱ्या गटाचे मत यापेक्षा वेगळे आहे.

# सिद्धू दाम्पत्याने केले 'राजकीय वर्तुळ' पूर्ण!

## राहुल गांधीं यांच्यावर कडाडून टीका करत भाजपाकडे वाटचाल?

**महाईन्यूज । चंडीगड**

**एकीकडे माजी क्रिकेटपटू आणि पंजाब काँग्रेसचे माजी अध्यक्ष नवज्योतसिंग सिद्धू सध्या टीव्हीवरील कॉमेडी शोमध्ये हास्यविनोदात मग्न आहेत. तर दुसरीकडे त्यांच्या पत्नी डॉ. नवज्योत कौर सिद्धू यांची काँग्रेसने पक्षातून अधिकृतपणे हकालपट्टी केली आहे. गेल्या काही दिवसांपासून पक्षनेतृत्व आणि सिद्धू दाम्पत्यामध्ये सुरू असलेल्या वादाचा हा परिपाक मानला जात आहे.**



### मुख्यमंत्रीपदाचा दावा

डॉ. नवज्योत कौर यांनी एक खळबळजनक दावा केला होता. त्यांनी म्हटले होते की, "पंजाबमध्ये मुख्यमंत्रीपद केवळ ५०० कोटी रुपये देणाऱ्यांनाच मिळते. आम्ही पंजाब आणि पंजाबियतबद्दल बोलतो, पण मुख्यमंत्री होण्यासाठी आमच्याकडे ५०० कोटी रुपये नाहीत." नंतर त्यांनी यावर स्पष्टीकरण देताना हा आरोप केवळ काँग्रेसवर नसून राजकारणातील भ्रष्टाचारावर असल्याचे म्हटले. मात्र, आता त्यांनी थेट राहुल गांधींना टीव्हीवर चर्चेचे आव्हान देत काँग्रेसमध्ये तिकिटांची विक्री होत असल्याचा गंभीर आरोप केला आहे.

### राजकारणातील वर्तुळ पूर्ण

काँग्रेसमधून बाहेर पडताना डॉ. नवज्योत कौर यांनी राहुल गांधींवर अत्यंत बोचऱ्या शब्दांत टीका केली आहे. भाजपने राहुल गांधींच्या प्रतिमेला छेद देण्यासाठी वापरलेला "पप्पू" हा शब्द वापरत त्यांनी राहुल गांधींना लक्ष्य केले. काही आठवड्यांपूर्वीच सिद्धू दाम्पत्याने राहुल आणि प्रियंका गांधी यांचा उल्लेख आपले 'मार्गदर्शक' असा केला होता. मात्र, आता हा प्रवास पुन्हा त्याच जुन्या टीकेपर्यंत येऊन पोहोचल्याने सिद्धू दाम्पत्याचे काँग्रेसशी बरोबरीचे वर्तुळ पूर्ण झाले.

### राजकीय प्रवास

२०१७ मध्ये भाजपमधून बाहेर पडून काँग्रेसमध्ये दाखल झालेल्या सिद्धू दाम्पत्याला पंजाबमध्ये महत्त्वाची भूमिका मिळाली; नवज्योतसिंग सिद्धू मंत्री झाले. मात्र अमरिंदर सिंग यांच्याशी मतभेद, नंतरचे बंड, चन्नींच्या नेतृत्वाखाली झालेला निवडणूक पराभव आणि अपघात प्रकरणातील शिक्षा यामुळे सिद्धूंची राजकीय घसरण झाली. सध्या काँग्रेसच्या प्रदेश नेतृत्वाशी सुरू असलेल्या वादांमुळे आणि पत्नीच्या आक्रमक भूमिकेमुळे सिद्धूंचे काँग्रेसमधील भवितव्य अनिश्चित बनले आहे.

### डॉ. नवज्योत कौर यांनी केले पंतप्रधान मोदींचे कौतुक

डॉ. नवज्योत कौर यांनी गेल्या काही दिवसांत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपचे खुलेआम कौतुक केले आहे. "भाजपनेच माझ्यातील कौशल्याची कदर केली होती," अशा शब्दांत त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. यामुळे हे दाम्पत्य पुन्हा भाजपमध्ये परतणार का? अशा चर्चांना उधाण आले आहे. दुसरीकडे, पंजाबमधील सत्ताधारी 'आप' (आम आदमी पार्टी) या वादापासून अंतर राखले असून, नवज्योतसिंग सिद्धू हे केवळ स्वार्थासाठी राजकारण करणारे 'स्थलांतरित पक्षी' असल्याची टीका केली आहे.

---

# रशियातील तेलावर ब्रेक; अमेरिकेत 500 अब्ज डॉलर्सची गुंतवणूक

**महाईन्यूज । न्यूयॉर्क**

**भारत आणि अमेरिका यांच्यात झालेल्या नव्या व्यापार कराराचे व्हाईट हाऊसकडून स्वागत करण्यात आले आहे. यानुसार भारताने रशियन तेलाची खरेदी थांबवण्याची तयारी दर्शवली असून, अमेरिकेतील प्रमुख क्षेत्रांमध्ये सुमारे 500 अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मान्य केले आहे, असे व्हाईट हाऊसच्या प्रेस सेक्रेटरी कॅरोलिन लेव्हिट यांनी मंगळवारी सांगितले. लेव्हिट यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, डोनाल्ड ट्रम्प आणि पंतप्रधान मोदी यांच्यात चर्चा झाली. दोन्ही नेत्यांमध्ये अतिशय चांगले संबंध आहेत आणि हा करार त्याचाच परिणाम आहे. भारत आता रशियन तेल खरेदी करणार नाही. उलट अमेरिकेकडून आणि शक्यतो व्हेनेझुएलाकडून तेल खरेदी करेल. याचा थेट फायदा अमेरिकन अर्थव्यवस्थेला आणि नागरिकांना होईल.**






### व्हाईट हाऊसच्या दाव्यानुसार

- भारत रशियन तेलाची खरेदी थांबवण्यास तयार
- अमेरिकेत 500 अब्ज डॉलर्सची भारतीय गुंतवणूक
- अमेरिकी टॅरिफ 18 टक्क्यांवर
- अमेरिकन वस्तूंवर भारतात शून्य टॅरिफ

### 500 अब्ज डॉलर्सची गुंतवणूक

भारत अमेरिकेतील ऊर्जा, वाहतूक आणि कृषी क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करणार आहे. अमेरिकन ऊर्जा, तंत्रज्ञान, कृषी उत्पादने आणि कोळसा यांची मोठ्या प्रमाणावर खरेदी करण्याचीही भारताने बांधिलकी दर्शवली आहे. अमेरिकन वस्तूंवर भारताकडून शून्य टॅरिफ आकारला जाणार आहे, असे सांगून लेव्हिट यांनी याला 'अमेरिकन कामगार, उद्योग आणि ग्राहकांसाठी मोठा विजय' असे संबोधले.

### मोदी-ट्रम्प संबंध अधिक मजबूत

पंतप्रधान मोदी यांनी या कराराचे स्वागत करताना सांगितले की, 'मेड इन इंडिया' उत्पादनांसाठी कमी टॅरिफ मिळणे हे 1.4 अब्ज भारतीयांसाठी आनंदाची बाब आहे. त्यांनी अध्यक्ष ट्रम्प यांचे आभार मानत भारत-अमेरिका भागीदारी पुढील काळात अधिक उंचीवर नेण्याचा विश्वास व्यक्त केला.

## मनोरंजन विश्वात मोठी खळबळ.!



तमिळ आणि मल्याळम चित्रपटसृष्टीतील अभिनेत्री अंजू कृष्णा हिला चेन्नईमध्ये अमली पदार्थ बाळगल्याप्रकरणी अटक करण्यात आली आहे. अँटी-नार्कोटिक्स इंटेलिजन्स युनिटच्या साऊथ टीमने वलसरवक्कम परिसरात छापा टाकत ही कारवाई केली. या कारवाईत अंजू कृष्णासह एकूण सात जणांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून ६ ग्रॅम मेथामफेटामाइन, ७ ग्रॅम गांजा, १५ ग्रॅम भांग, एक LSD स्टॅम्प आणि ९ मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत. अटक झालेल्यांमध्ये असिस्टंट डायरेक्टर विन्सी निवेधा, कार्तिक राजा, यशवंत, श्रीराम, अल्विबिनशा आणि व्यंकटेश कुमार यांचा समावेश आहे. सध्या सर्वांची चौकशी सुरू असून पुढील तपास अँटी-नार्कोटिक्स इंटेलिजन्स युनिट करत आहे. या प्रकरणात नाव येण्यापूर्वी अंजू कृष्णाला तमिळ आणि मल्याळम चित्रपटांतील अभिनयासाठी ओळखले जात होते. ३१ वर्षीय अंजूने अनेक चित्रपटांत काम केलं आहे. IMDB नुसार, तिने 'आकाशम कडन्न', 'आरो' आणि 'ओम वेल्लिमालई' सारख्या चित्रपटांत अभिनय केला. २०२३ मध्ये प्रदर्शित झालेला 'ओम वेल्लिमालई' हा चित्रपट ओम विजय यांनी दिग्दर्शित केला होता, ज्यामध्ये सुपरगुड सुब्रमणी आणि वीरा सुभाष मुख्य भूमिकेत होते.

## अफेअर अफवांवर स्पष्ट प्रतिक्रिया



बॉलीवूड अभिनेत्री शमिता शेट्टी सध्या चर्चेत आहे. 2 फेब्रुवारी रोजी तिने आपला 47 वा वाढदिवस साजरा केला. यावेळी तिने बहिण शिल्पा शेट्टी आणि जीजा राज कुंद्रासोबतचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले. या फोटोंमध्ये तिच्यासोबत एक बिजनेसमन दीपेशही दिसत होता. त्यामुळे सोशल मीडियावर शमिता आणि दीपेश यांच्या अफेअरच्या चर्चा सुरू झाल्या. या अफवांवर आता शमिता शेट्टीने स्वतः प्रतिक्रिया दिली आहे. 4 फेब्रुवारी रोजी तिने आपल्या इंस्टाग्राम स्टोरीत लिहिले की, "मी सिंगल आहे आणि शांत आयुष्य जगते आहे. खऱ्या मैत्रीचा चुकीचा अर्थ काढणं थांबवा. हे सगळं अगदीच बकवास आहे." शमिताने स्पष्ट शब्दांत या अफवा फेटाळून लावल्या आहेत. वाढदिवसाच्या फोटोंनंतर आणि दीपेशच्या पोस्टवर तिने केलेल्या कमेंटमुळे गैरसमज पसरला, मात्र दोघांमध्ये केवळ मैत्री असल्याचं तिने सांगितलं आहे. त्यामुळे शमिताच्या अफेअरच्या बातम्यांना पूर्णविराम मिळाला आहे.


## ऐश्वर्या रायची खास पोस्ट व्हायरल

बॉलीवूड अभिनेता अभिषेक बच्चन, ५ फेब्रुवारी रोजी, आपला ५० वा वाढदिवस साजरा करत आहे. या खास दिवशी संपूर्ण चित्रपटसृष्टीतून त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असताना पत्नी ऐश्वर्या राय बच्चन हिनेही एक खास आणि भावनिक पोस्ट शेअर केली आहे. ऐश्वर्याने अभिषेकचा बालपणीचा एक गोड फोटो सोशल मीडियावर शेअर केला. या फोटोसोबत तिने कॅप्शनमध्ये अभिषेकचा उल्लेख 'BABY PAPA' असा करत त्याचं वयही सांगितलं. तिच्या पोस्टमध्ये ती लिहिते, "५० व्या वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा डिअर BABY PAPA... तुला भरपूर प्रेम, शांती, आनंद, समाधान आणि उत्तम आरोग्य लाभो. कायम आनंदी राहा." अभिषेक बच्चनचा जन्म ५ फेब्रुवारी १९७६ रोजी झाला असून, तो ५० वर्षांचा झाला आहे. ऐश्वर्याची ही पोस्ट समोर येताच चाहत्यांनी कमेंट्सचा पाऊस पाडला आहे. "खूपच गोड फोटो आहे", "कॅप्शन फारच सुंदर आहे", "तुम्ही दोघं कायम आनंदी राहा" अशा प्रतिक्रिया चाहत्यांनी दिल्या आहेत.



## भागम भागच्या सिक्वलची घोषणा

२००६ मध्ये भागम भाग हा कॉमेडी चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटात अक्षय कुमार आणि गोविंदाच्या जोडीने प्रेक्षकांचे तुफान मनोरंजन केले. आजही हा चित्रपट टेलिव्हिजनवर लागला तर प्रेक्षक तितक्याच आवडीने बघतात. आता तब्बल वीस वर्षांनतर या चित्रपटाचा सीक्वल प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. काही माध्यमांच्या रिपोर्टनुसार, चित्रपटातील कास्टमध्ये मोठा बदल करण्यात आला असल्याचे सांगितले जात आहे.



अभिनेता गोविंदाच्या जागी अभिनेता मनोज बाजपेयीला घेतले जाणार असल्याचे समोर येत आहे. पहिल्या भागात गोविंदाचा कॉमेडी सीन्स अफलातून होता. त्यामुळे दुसऱ्या भागात तो असणार हे निश्चित मानले जात असतानाच आता हा बदल समोर आल्याने चाहत्यांमध्ये हिरमोड झाल्याची भावना आहे. तूर्तास याबाबत अधिकृत अशी कोणतीही माहिती समोर आलेली नाही. भागम भागमध्ये इतर कलाकारांनी देखील अफलातून अभिनय केला होता. पण हल्ली एखाद्या चित्रपटाचा सीक्वल येणार असल्याचे जाहीर केल्यानंतर त्यातील कास्टमध्ये काही प्रमाणात बदल केले जातात. असे बहुतांशी वेळा घडत आहे. याबाबत अशीही माहिती आहे की कलाकारांच्या तारखांचा अडथळा किंवा मग इतर कारणांमुळे चित्रपटात आधीच्या चित्रपटातील कलाकार दिसत नाहीत. दरम्यान, राज शांडिल्य दिग्दर्शित 'भागम भाग २'च्या निर्मात्यांनी दावा केला की, चित्रपटातील कलाकार हे बदलू शकतात. तसेच चित्रपटाची तीच कथा असेल गैरसमज, ओळखीची अदलाबदल आणि वेगाने वाढणारा गोंधळ. आता पुन्हा एकदा प्रेक्षकांना तोच अनुभव चित्रपटगृहांमध्ये मिळणार आहे. या चित्रपटामध्ये अक्षय कुमार आणि परेश रावल यांच्याबरोबर मीनाक्षी चौधरी दिसणार आहे. पण मग मनोज बाजपेयी असल्यास तो अक्षय कुमारबरोबर काय धमाल करेल, याचे उत्तर मिळण्यासाठी प्रेक्षकांना वाट पहावी लागणार आहे.

## रिया चक्रवर्तीचे कमबॅक

अभिनेता सुशांतसिंह राजपूतच्या आत्महत्येनंतर बॉलीवूडमध्ये खळबळ उडाली. या प्रकरणी सुशांतची गर्लफ्रेंड अभिनेत्री रिया चक्रवर्तीवर गंभीर आरोप करण्यात आले. तिच्यावरच सुशांतला ड्रग देऊन आत्महत्येस प्रवृत्त केल्याचे आरोप झाले होते. इतकेच काय तर तिला तुरुंगात देखील जावं लागलं.काही महिन्यांपूर्वीच रियाला क्लीनचीट मिळाली. या संपूर्ण घटनेनंतर ती सिनेसृष्टीपासून दूर होती. अखेर ती या घटनेतून सावरत पुन्हा एकदा कमबॅक करण्यास सज्ज झाली. रिया चक्रवर्ती 'फॅमिली बिझनेस' या वेब सीरिजच्या माध्यमातून आपल्या अभिनय कारकिर्दीची नवी सुरुवात करत आहे. या पुनरागमनाबाबत रियाने इन्स्टाग्रामवर एक भावनिक व्हिडिओ शेअर केला आहे. ज्यात तिने पोस्टच्या कॅप्शनमध्ये आयुष्यातील चढ-उतारांबद्दल भाष्य केले.



# अंडर-१९ वर्ल्डकप विजेता संघ मालामाल

## बीसीसीआयने जाहीर केली कोट्यवधी बक्षिसाची रक्कम

**महाईन्यूज | नवी दिल्ली**

**भारताच्या अंडर-१९ संघाने २०२६च्या विश्वचषकाचे जेतेपद पटकावले. कर्णधार आयुष म्हात्रेच्या नेतृत्त्वाखाली युवा टीम इंडियाने स्पर्धेत अपराजित राहत ट्रॉफी आपल्या नावे केली. अंतिम सामन्यात टीम इंडियाने इंग्लंडचा तब्बल १०० धावांनी पराभव करत एकतर्फी विजय मिळवला. यासह भारताने विक्रमी सहाव्यांदा अंडर-१९ विश्वचषक ट्रॉफीवर नाव कोरलं. या विजयानंतर बीसीसीआयने टीम इंडियासाठी कोट्यवधींची बक्षिसाची रक्कम जाहीर केली आहे.**




भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करताना वैभव सूर्यवंशीच्या ८० चेंडूत १७५ धावांच्या खेळीच्या बळावर ४११ धावांचा डोंगर उभारला. भारताच्या इतर फलंदाजांनीही महत्त्वाचं योगदान दिलं. तर गोलंदाजीत टीम इंडियाच्या गोलंदाजांनी कमालीची गोलंदाजी करत इंग्लंडच्या फलंदाजांना फार काळ मैदानावर टिकू दिलं नाही आणि सामना १०० धावांनी जिंकला.

२०२६ चा १९ वर्षाखालील विश्वचषक जिंकल्याबद्दल बीसीसीआयने भारताच्या अंडर-१९ संघाला ७.५ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर केलं. बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी एएनआयशी बोलताना सांगितलं की, “२०२६ चा अंडर-१९ विश्वचषक जिंकल्याबद्दल संपूर्ण देश आणि बीसीसीआयला आमच्या अंडर-१९ संघाचा अभिमान आहे. आमच्या संघाने अंतिम सामन्यात इंग्लंडला ज्या पद्धतीने हरवलं आणि स्पर्धेत ते ज्या प्रकारे अपराजित राहिले त्याचा आम्हाला सर्वांना अभिमान आहे. बीसीसीआय संघाला ७.५ कोटी रुपयांचे रोख बक्षीस देऊन सन्मानित करेल.”

तत्पूर्वी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अंडर-१९ संघाचे विश्वचषकातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल अभिनंदन केलं होतं, “भारताच्या प्रतिभावान क्रिकेटपटूंची चमकदार कामगिरी! विश्वचषक मायदेशी आणल्याबद्दल अंडर-१९ संघाचा अभिमान आहे. संपूर्ण स्पर्धेत संघ खूप छान खेळला, अपवादात्मक कौशल्य दाखवलं. या विजयामुळे अनेक तरुण खेळाडूंना प्रेरणा मिळेल. आम्ही खेळाडूंना त्यांच्या आगामी जीवनासाठी शुभेच्छा देतो.”

भारतीय अंडर-१९ संघाने २०२६ चा आयसीसी अंडर-१९ विश्वचषक जिंकला, अंतिम सामन्यात इंग्लंड अंडर-१९ संघाचा १०० धावांनी पराभव केला आणि झिम्बाब्वेच्या हरारेमध्ये त्यांचे सहावे विजेतेपद पटकावले.

# टी-२० वर्ल्डकपमध्ये वेस्ट इंडिजची विजयी सलामी

**महाईन्यूज | नवी दिल्ली**

**आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील दुसरा सामना वेस्ट इंडिज आणि स्कॉटलंड या दोन्ही संघांमध्ये पार पडला. कोलकात्यातील ईडन गार्डन्सच्या मैदानावर पार पडलेल्या या सामन्यात स्कॉटलंडने नाणेफेक जिंकून वेस्ट इंडिजला प्रथम फलंदाजीचे आमंत्रण दिले होते. वेस्ट इंडिजकडून पहिल्या डावात फलंदाजी करताना शिमरोन हेटमायरने दमदार अर्धशतकी खेळी केली. या खेळीच्या बळावर वेस्ट इंडिजने ५ गडी बाद १८२ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करताना स्कॉटलंडच्या फलंदाजांनी पूर्ण जोर लावला, पण वेस्ट इंडिजने हा सामना ३५ धावांनी आपल्या नावावर करून विजयाचं खातं उघडलं.**

या सामन्यात वेस्ट इंडिजचा संघ नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात आला. सलामीला आलेल्या ब्रेंडन किंग आणि कर्णधार शे होपने दमदार सुरूवात करून दिली. दोघांनी मिळून पहिल्या विकेटसाठी ५४ धावांची भागीदारी केली. यादरम्यान ब्रेंडन किंगने ३५ धावांचे योगदान दिले. तर शे होपने १९ धावा केल्या. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या शिमरोन हेटमायरने फलंदाजीत कमाल केली. त्याने ३६ चेंडूंचा सामना करत २ चौकार आणि ६ षटकारांच्या साहाय्याने ६४ धावांची खेळी केली. तर रोमन पॉवेलने २४ धावांची खेळी केली. शेवटी शेरफेन रुदरफोर्डने १३ चेंडूत २६ धावा चोपल्या.या दमदार खेळीच्या बळावर वेस्ट इंडिजने २० षटकांअखेर ५ गडी बाद १८२ धावा केल्या.

स्कॉटलंडला या स्पर्धेतील पहिला विजय मिळवण्यासाठी १८३ धावांचा डोंगर सर करायचा होता. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या स्कॉटलंडला सुरुवातीलाच मोठा धक्का बसला. सलामीवीर फलंदाज मायकल जोन्स ५ चेंडूत १ धाव करून माघारी परतला. तर जॉर्ज मुंसीने १५ चेंडूत अवघ्या १९ धावा केल्या. स्कॉटलंडला हवी तशी सुरूवात मिळू शकली नाही. त्यानंतर ब्रेंडन मॅक्मुलेन अवघ्या १४ धावा करून माघारी परतला. त्यानंतर कर्णधार रिची बेरिंगटन आणि टॉम ब्रुसने मिळून स्कॉटलंड संघाचा डाव सांभाळला.

रिची बेरिंगटन ४२ धावा करून माघारी परतला. तर इतर फलंदाजांनाही हवी तशी कामगिरी करता आली नाही. त्यामुळे स्कॉटलंडला हा सामना थोडक्यात गमवावा लागला आहे.




### रोमारियो शेफर्डची हॅट्रिक

या सामन्यातील १७ वे षटक वेस्ट इंडिजसाठी टर्निंग पॉईंट ठरले. या षटकात गोलंदाजी करताना शेफर्डने हॅट्रिक पूर्ण केली. त्यानंतर १ चेंडू शिल्लक ठेवून पुढच्याच चेंडूवर आणखी एक विकेट घेतला. यासह एकाच षटकात त्याने ४ विकेट्स घेतल्या. या सामन्यात गोलंदाजी करताना त्याने ५ गडी बाद केले.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

epaper.mahaenews.com

ePaper

। रविवार।

दि. 08 फेब्रुवारी 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# "स्वीकृत" साठी भाजपाचा "फॉर्म्युला" ठरला!

## इच्छुकांचे देव पाण्यात: ७ जागांवर कुणाची वर्णी लागणार?

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**सुमारे ३५ लाख लोकसंख्या असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरामध्ये भारतीय जनता पार्टीने आता सत्तास्थापन केली आहे. महापालिकेतील नगरसेवकांची एकूण संख्या १२८ असून, त्यापैकी ८४ जागा भाजपाने जिंकल्या आहेत. प्रत्येक १२ नगरसेवकांमागे एक स्वीकृत नगरसेवक या सूत्रानुसार भाजपाच्या वाट्याला ७ स्वीकृत सदस्य येत आहेत. त्यासाठी इच्छुकांनी "गल्लीपासून अगदी दिल्लीपर्यंत फिल्डिंग" लावली आहे.**




स्वीकृत नगरसेवकपदासाठी इच्छुकांची संख्या जास्त आहे. प्रत्येकाला न्याय देता आला पाहिजे. या अनुषंगाने भारतीय जनता पार्टीच्या स्थानिक नेतृत्वाची याबाबत विस्तृत बैठक झाली. अधिकाधिक इच्छुकांना संधी देता यावी. या करिता सव्वा वर्षाकरिता स्वीकृत नगरसेवकपद देण्यात येणार आहे. म्हणजे ५ वर्षांच्या सत्ताकाळात २८ स्वीकृत नगरसेवक भाजपा बनवणार आहे.

ज्या इच्छुकांनी निवडणूक लढवली होती आणि त्यांचा पराभव झाला आहे, अशा इच्छुकांना किंवा त्यांच्या कुटुंबियांमध्ये स्वीकृत नगरसेवकपदी संधी नाही. तसेच, इच्छुक उमेदवार हा भाजपाचा सक्रीय सदस्य असावा. त्याच्या प्रभागात बूथ आणि शक्तिकेंद्रावर भाजपाच्या उमेदवारांना मताधिक्य असायला हवे. समाजात आणि संघटनेत त्याचे कार्य असावे. बूथ यंत्रणेवर काम केलेले आणि संघटनेसाठी समर्पित भावनेतून कर्तव्य बजावलेल्या इच्छुकांची यादी प्रदेश नेतृत्वाने मागवली आहे. त्यानुसार, पक्षाशी निष्ठावंत आणि समाजातील पत या अनुषंगाने विचार करण्यात येणार आहे. लोकसभा, विधानसभा आणि महापालिका अशा निवडणुकांमध्ये केलेल्या पक्ष कार्याचे मूल्यमापनसुद्धा कटाक्षाने होणार आहे, अशी माहिती विश्वासनीय सूत्रांनी दिली.

### जातीय समतोल साधणार..!

पिंपरी-चिंचवडमध्ये जातीय समीकरणांचा विचार करता सर्वाधिक मतदार मराठा समाजाचे आहे. त्यानंतर माळी आणि धनगर समाजाचे प्राबल्य आहे. त्यानंतर दलित समाज आणि मुस्लिम समाजाची संख्याही निर्णायक आहे. त्यामुळे सर्व जातीच्या समाजातील प्रतिनिधित्व देवून भाजपाचे नेतृत्त्व जातीय सलोखा राखवण्याचा प्रयत्न करणार आहे. सांगली-सातारा- कोल्हापूर-सोलापूर अर्थात "साकोसा", कोकणवासी, विदर्भ-मराठवाडावासी आणि खानदेशमधून शहरात वास्तव्य करणाऱ्या नागरिकांमध्ये चांगले काम करणाऱ्या एका प्रतिनिधीची स्वीकृत सदस्यपदी वर्णी लागू शकते. तसेच, अन्य राज्यातून मोठ्या प्रमाणात वास्तव्य करणारे अमराठी समाजाला म्हणजेच जैन-मारवाडी-राजस्थान-गुजराती- उत्तर भारतीय आणि दक्षिण भारतीय समाजातून समाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तिमत्वाला स्वीकृत सदस्यपदी नियुक्ती देण्याचा विचार केला जात आहे.

# अजितसृष्टी उभारणार; महापालिकेच्या पहिल्याच सभेत निर्णय

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**राज्याचे उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांचे शहर विकासात मोठे योगदान आहे. कर्तृत्व संपन्न, महाराष्ट्राला दिशा देणारे नेतृत्व हरपले आहे. कामकाज सुरु असलेल्या महापालिकेच्या नवीन इमारतीसमोर अजित पवार यांचा ब्रॉंझचा पुतळा उभारला जाईल. त्यांच्या स्मृती जतन करण्यासाठी अजित सृष्टी उभारण्यात येईल.**



सद्याच्या महापालिका सभागृहात त्यांचे तैलचित्र बसविले जाईल, अशी घोषणा महापालिकेच्या पहिल्याच विशेष सभेत शुक्रवारी करण्यात आली.

महापौर आणि उप महापौरांची निवड झाल्यानंतर विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्याचा प्रस्ताव मांडला. ते म्हणाले, 'अजित पवार यांच्या जाण्याने मोठी पोकळी निर्माण झाली आहे. अजितदादांचे तैलचित्र सभागृहात बसवावे. नवीन इमारती समोर त्यांचा पुतळा उभारावा. महापौरपदाची खुर्ची काटेरी आहे. महापालिकेत काम करत असताना विरोधाला विरोध न करता काम केले जाईल. सत्ताधाऱ्यांनी शहर विकासाचा आराखडा तयार करावा. शहर बकाल होत चालले असून आर्थिक परिस्थिती अतिशय कठीण आहे'.

भोईर यांच्या प्रस्तावाला सभागृह नेते प्रशांत शितोळे यांनी अनुमोदन दिले. ते म्हणाले, 'शहराला गती देण्याचे काम अजितदादांनी केले. कर्तृत्व संपन्न, महाराष्ट्राला दिशा देणारे नेतृत्व हरपले आहे. प्रस्तावित महापालिका इमारतीसमोर हेवा वाटेल असा अजितदादांचा ब्रॉंझचा पुतळा उभारला जाईल. त्यांच्या स्मृती जतन करण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन अजित सृष्टी उभारण्यात येईल. सद्याच्या महापालिका सभागृहात तैलचित्र बसविले जाईल', अशी घोषणाही त्यांनी केली.

महापालिकेची विशेष सभा २० फेब्रुवारीपर्यंत तहकूब करण्याची सूचना शत्रुघ्न काटे यांनी मांडली. त्याला राजू मिसाळ यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर महापौर रवि लांडगे यांनी २० फेब्रुवारी रोजी दुपारी एक वाजेपर्यंत सभा तहकूब केल्याचे जाहीर केले.

राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) पक्षाने सहा वेळा नगरसेवक झालेले ज्येष्ठ नगरसेवक भाऊसाहेब भोईर यांना विरोधी पक्षनेते पदाची संधी दिली. महापौर रवि लांडगे यांचे वडील आणि चुलत्यांबरोबर काम केले आहे. आता रवि यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळाली आहे. आता तुमच्या मुलांबरोबर काम करण्याची माझी अजिबात इच्छा नसल्याचे भोईर म्हणताच सभागृह हास्यकल्लोळात बुडाले.

# उपमहापौर नियुक्तीवरुन राष्ट्रवादीत ठिणगी..!

## शहराध्यक्ष योगेश बहल यांनी "ती" बैठक सोडली; बाहेरचा विरुद्ध स्थानिक वाद पेटला?

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील महापौर, उपमहापौर आणि सत्तारुढ पक्षनेत्यासह विरोधी पक्षनेत्यांची निवड झाली. मात्र, ही निवड होत असताना सत्ताधारी आणि विरोधकांमध्येही काहीअंशी नाराजीनाट्य समोर आले. राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष तथा ज्येष्ठ नगरसेवक योगेश बहल यांनी उपमहापौर नियुक्तीपूर्वी झालेल्या बैठकीत तीव्र नाराजी व्यक्त करीत बैठक सोडली होती. त्याचे कारण आता समोर आले आहे.**



राज्यातील सत्तेत प्रमुख घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने महानगरपालिका निवडणूक स्वबळावर लढली. ही लढत मैत्रीपूर्ण होईल, असा दुजोरा त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यातच दिला होता. पण, निवडणूक स्थानिक पातळीवर अत्यंत चुरशीची आणि आरोप-प्रत्यारोपांची झाली. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केली होती. कारण, अजितदादांना महापालिकेत निर्णायक संख्याबळ तयार करायचे होते. निवडणूक झाल्यानंतर "महायुती" म्हणून पुन्हा भाजपा+ राष्ट्रवादी+ शिवसेना एकत्रित सत्ता स्थापन करण्याचे नियोजन होते. कारण, महाविकास आघाडी किंवा विरोधकांना 'पॉलिटीकल स्पेस' मिळू नये. यासाठी हा निर्णय वरिष्ठ पातळीवर झाला होता, असे सांगितले जाते.

"सत्तेत सहभागी झाल्याशिवाय विकासकामे करता येणार नाही. कार्यकर्त्यांना ताकद देता येणार नाही.." हे सूत्र दिवंगत अजितदादांना पूर्णपणे ज्ञात होते. त्यामुळेच त्यांनी 2023 मध्ये भाजपासोबत जाण्याचा निर्णय घेतला होता. कारण, 2017 मध्ये महापालिका निवडणूक झाली. त्यानंतर 4 वर्षे प्रशासकीय राजवट झाली. म्हणजे गेली 9-10 वर्षे राष्ट्रवादीचे 36-37 नगरसेवक विरोधात आहे. जे भारतीय जनता पार्टीच्या स्थानिक नेतृत्त्वाविरोधात निकराने लढत आहेत. आता पुढील पाच वर्षे पुन्हा विरोधात म्हणजे सुमारे 14 वर्षे विरोधात बसण्याचा वनवास राष्ट्रवादीच्या निवडून आलेल्या नगरसेवकांना भोगावा लागणार आहे. किंबहुना, पराभूत झालेल्या उमेदवारांना पूर्ण बहुमत असलेल्या भाजपाविरोधात 5 वर्षे प्रभागात अस्थित्व टिकवण्याची लढाई लढावी लागणार आहे.

याबाबत ठोस निर्णय घेण्याची संधी "उपमहापौर" पदाच्या निवडणुकीच्या निमित्ताने होती. त्यासाठी दिवंगत अजितदादा पवार यांचे निष्ठावंत आणि विधानसभा उपाध्यक्ष आण्णा बनसोडे यांच्या कार्यालयात नवनिर्वाचित नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीत "राष्ट्रवादीने उपमहापौरपद घ्यावे आणि सत्तेत सहभागी व्हावे. राज्यात आणि केंद्रात पक्ष सत्तेत आहे. स्थानिक पातळीवर पक्षाची ताकद सक्षम ठेवण्यासाठी आणि पदाधिकारी-नगरसेवक- कार्यकर्त्यांना बळ देवून पक्ष संघटन प्रभावी करावे, अशी ठाम भूमिका शहराध्यक्ष तथा ज्येष्ठ नगरसेवक योगेश बहल यांनी मांडली.

### योगेश बहलांच्या प्रस्तावाला स्थानिकांचा विरोध...

गेली 9 वर्षे आणि पुढील 5 वर्षे असे एकूण 14 वर्षे विरोधात आणि संघर्षमय वाटचालीमध्ये राष्ट्रवादीतील ताकदीच्या कार्यकर्त्यांची एक फळी प्रभावित होईल. विरोधात बसून, राष्ट्रवादी नवी फळी तयार करता येणार नाही. कार्यकर्ते-पदाधिकाऱ्यांना ताकद देता येणार नाही. राज्यात आणि केंद्रात सत्तेत असतानाही अजितदादांनी भाजपाच्या चुकीच्या कामाला विरोध केला. तसेच, आपण शहरात सत्तेत सहभागी होवू आणि भाजपाच्या चुकीच्या कामांना उघडपणे विरोध करण्याची भूमिका घेवू..." असा प्रस्ताव योगेश बहल यांनी ठेवला. पण, त्याला तीव्र विरोध करण्यात आला.

### योगेश बहल राष्ट्रवादीत एकाकी..?

राष्ट्रवादीचे नवनिर्वाचित विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, ज्येष्ठ नगरसेवक नाना काटे, माजी शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांच्यासह स्थानिक काही दिग्गजांनी योगेश बहल यांच्या भूमिकेला बैठकीत विरोध केला. "भाजपासोबत सत्तेत सहभागी व्हायचे नाही... अन्यथा आम्ही सर्वजण बाहेर पडतो..." अशी भूमिका स्थानिक नेत्यांनी घेतली. यावर, विरोधात बसून पक्षाचा फायदा नाही. कार्यकर्ते-नगरसेवकांची कामे होणार नाहीत. आपण बदलत्या राजकीय समीकरणांनुसार निर्णय घेतले पाहिजेत. "माझा तुम्हाला त्रास होत असेल, तर मीच बाहेर पडतो..." अशी नाराजी योगेश बहल यांनी व्यक्त केली आणि त्यानंतर त्यांनी बैठक सोडली आणि तिथून बाहेर पडले. त्यानंतर बैठकीत स्थानिक आणि बाहेरचा असा जुना वाद पुन्हा उफाळून आला. भाजपासोबत सत्तेत सहभागी व्हायचे नाही, ही भूमिका घेण्यात आली. राष्ट्रवादीत योगेश बहल एकाकी पडले, तर भाऊसाहेब भोईर आणि अन्य सहकाऱ्यांनी विरोधात बसून काम करण्याचा निर्णय घेतला.

# स्वच्छ व नियमित पाणीपुरवठा नागरिकांचा हक्क : महापौर रवि लांडगे

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे यांनी शहरातील वाढत्या पाणीपुरवठ्याच्या गरजा आणि यंत्रणेची क्षमता पाहण्यासाठी निगडी व चिखली जलशुद्धीकरण केंद्रांची पाहणी केली. पाहणीदरम्यान महापौरांनी शहराला लागणारी पाणीची एकूण गरज, सध्या चालू असलेला पाणीपुरवठा आणि भविष्यातील वाढती मागणी लक्षात घेता राबविल्या जाणाऱ्या उपाययोजनांची सविस्तर माहिती घेतली.**

### पाहणीवेळीअधिकारी व कर्मचारी

अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सहशहर अभियंता अजय सुर्यवंशी, चीफ केमिस्ट डॉ. प्रशांत जगताप, कार्यकारी अभियंता विजयसिंग भोसले, महेश बरीदे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आणि पाणीपुरवठा विभागातील संबंधित कर्मचारी उपस्थित होते.



"स्वच्छ आणि नियमित पाणीपुरवठा हा प्रत्येक नागरिकाचा हक्क आहे. महापालिका या हक्काची पूर्तता करण्यासाठी सर्व पायाभूत सुविधा अधिक सक्षम आणि दर्जेदार बनविण्यावर सतत काम करत आहे. नागरिकांनी भविष्यातही कुठेही पाण्याची तूट जाणवू नये यासाठी आम्ही कठोर उपाययोजना राबवत आहोत."

– **रवि लांडगे**, महापौर, पिंपरी-चिंचवड, पुणे.

### चिखली क्षेत्रासाठी

1. सध्या इंद्रायणी नदीवरील निगोजे बंधाऱ्यातून दररोज ९० एमएलडी पाणी घेतले जाते.
2. भविष्यातील मागणी पूर्ण करण्यासाठी भामा आसखेड धरणातून २०० एमएलडी क्षमतेचा स्वतंत्र जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्याचे काम सुरू आहे.

### निगडी क्षेत्रासाठी

1. सेक्टर २३ येथील जलशुद्धीकरण केंद्र सुरुवातीला ११४ एमएलडी क्षमतेने कार्यरत होते, पण सध्या ते ५५० एमएलडी क्षमतेने शहराच्या सुमारे ७५% भागाला पाणीपुरवठा करत आहे.
2. महापौरांना पाणी शुद्धीकरण प्रक्रिया, गुणवत्तेची तपासणी आणि वितरण याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.
3. महापौर रवि लांडगे यांनी शहरातील नागरिकांना भविष्यातही नियमित, पुरेशा दाबाने आणि दर्जेदार पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी पायाभूत सुविधा मजबूत करण्याची गरज असल्याचे सांगितले.

# सीमाताई विसरल्या; पण सुलक्षाताईंनी आवाज उठवला!

## माता रमाई स्मारक : सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजुर करा अन् काम सुरू करा!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**संघर्ष, त्याग आणि अढळ प्रेमाची मूर्ती असलेल्या, आमच्या माऊली माता रमाई आंबेडकर यांना जयंतीनिमित्त कोटी कोटी वंदन, असे भावनिक शब्दांत माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत-धर यांनी अभिवादन केले. महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रत्येक संघर्षात, चळवळीत आणि सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यात रमाई आंबेडकर अखेरपर्यंत खंबीरपणे त्यांच्या सोबत उभ्या राहिल्या. वात्सल्य आणि करुणेचे प्रतीक असलेले रमाईंचे आदर्शवत विचार आजही समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.**





पिंपरी-चिंचवडमधील आंबेडकरी समाजाच्या अस्मितेचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या माता रमाई आंबेडकर यांच्या स्मारकाचा प्रस्ताव तात्काळ सर्वसाधारण सभेत मंजूर करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी, अशी ठाम मागणी सुलक्षणा शिलवंत-धर यांनी केली आहे. पिंपरी-चिंचवडमधील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या शेजारी माता रमाई आंबेडकर स्मारक प्रस्तावित असून, महापालिका निवडणुकीच्या काळात सत्ताधारी भारतीय जनता पार्टीने स्मारक उभारणीचे आश्वासन दिले होते. हे स्मारक केवळ वास्तू नसून समाजाच्या अस्मितेचा विषय असल्याने प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी येत्या सर्वसाधारण सभेत हा प्रस्ताव मंजूर करून काम सुरू करावे, अशी आग्रही मागणी त्यांनी केली आहे.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड शहराच्या प्रस्तावित सुधारित विकास आराखड्यात माता रमाई स्मारकाचा स्पष्ट उल्लेख नसल्याचा दावा करत माजी नगरसेविका सीमा सावळे यांनी काही दिवसांपूर्वी आंदोलनाचा इशारा दिला होता. विधानसभा निवडणुकीच्या काळातही त्यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता. मात्र आज माता रमाई आंबेडकर यांची जयंती असतानाही सीमाताईंनी अभिवादनाची साधी सोशल मीडिया पोस्टदेखील केली नाही. किंबहुना, माता रमाई आंबेडकर स्मारकाबाबत त्यांची भूमिका ही केवळ राजकीय स्टंटबाजीपुरतीच मर्यादित होती का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

> “माता रमाई आंबेडकर यांचे स्मारक ही केवळ वास्तू नाही, तर आंबेडकरी समाजाच्या संघर्ष, त्याग आणि अस्मितेचे प्रतीक आहे. हे स्मारक उभारण्यासाठी सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजूर करून प्रत्यक्ष काम सुरू होईपर्यंत आम्ही शांत बसणार नाही. माता रमाईंच्या विचारांना आणि योगदानाला न्याय मिळेपर्यंत हा लढा सुरूच राहील.
> महापालिकेतील सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी आणि स्थानिक नेत्यांनी याकामी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा आहे.
> — **सुलक्षणा शिलवंत-धर,** माजी नगरसेविका.

# महापौर निवडीत महेशदादांचा सिंहाचा वाटा: महापौर रवि लांडगे

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापौरपदी नवनिर्वाचित रवि लांडगे यांची निवड होताच भोसरीतील त्यांचे कुटुंबीय आणि मित्रपरिवाराची त्यांनी खास सदिच्छा भेट घेतली. भारतीय जनता पार्टीचे नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या घरी झालेल्या या भेटीत त्यांचे वडील वस्ताद किसनराव लांडगे यांनी स्वतः फेटा बांधून महापौर रवि लांडगे यांचा सन्मान केला.**





सदिच्छा भेटीदरम्यान लांडगे कुटुंबाच्या जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. कै. बाबासाहेब लांडगे, वस्ताद किसनराव लांडगे आणि कै. शंकरराव लांडगे यांनी भोसरी गावठाणमधील बापूजी बुवा चौकात आझाद गणेश मित्र मंडळ एकत्र येऊन स्थापन केले होते. त्या काळातील जिद्दी आणि मैत्रीची आठवण सांगताना वस्ताद किसनराव लांडगे यांनी भावनिक अनुभव व्यक्त केला.

यावेळी त्यांनी रवि लांडगे यांना टीका-टिप्पणीकडे दुर्लक्ष करून काम करत राहण्याचा सल्ला दिला. रवि लांडगे यांनीही व्यक्त केले की, महापौरपदी संधी मिळाल्यामुळे संपूर्ण लांडगे परिवार एकत्र आला असून, शहराच्या विकासात सर्वांनी एकत्रितपणे मोलाचे योगदान द्यायचे आहे असा संकल्प लांडगे कुटुंबीयांनी केला आहे.

> “पिंपरी-चिंचवडच्या प्रत्येक नागरिकासाठी विकास, सुव्यवस्था आणि संधी या तीन गोष्टी माझ्या नेतृत्वाखाली प्राधान्य असतील. आपण एकत्र येऊन शहराला अधिक सशक्त, स्वच्छ आणि सर्वांगीसाठी समृद्ध बनवू.”
> – **रवि लांडगे,**महापौर, पिंपरी-चिंचवड.

# ‘बिझ टँक २०२६’ दिमाखात संपन्न

## आकुर्डीच्या डी. वाय. पाटील पीजीडीएम इन्स्टिट्यूटचा अनोखा उपक्रम

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

**नवनवीन व्यवसाय संकल्पना, दिग्गज गुंतवणूकदारांचे मार्गदर्शन आणि तरुणाईचा उत्साह अशा वातावरणात आकुर्डी येथील डी. वाय. पाटील पीजीडीएम इन्स्टिट्यूट आयोजित 'BIZ TANK 2026' हा उपक्रम दिमाखात पार पडला. या स्पर्धेत 'ISOFLOW 4' या कल्पनेने प्रथम क्रमांक पटकावत ५ एंजेल गुंतवणूकदारांकडून तब्बल ६ लाख रुपयांचा निधी आणि २ लाखांचे कायदेशीर प्रायोजकत्व मिळवून मोठे यश संपादन केले.**




**१२५+ स्टार्टअप कल्पना**

WIRRER SOLUTIONS' आणि 'डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग' यांच्या सहकार्याने आयोजित या उपक्रमात देशभरातील ४४ नामवंत संस्थांमधून १२५ हून अधिक स्टार्टअप कल्पना सादर झाल्या. यामध्ये आयआयएम लखनऊ, सिंबायोसिस, आयआयएसईआर (IISER) आणि गोवा इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट यांसारख्या संस्थांचा समावेश होता. गोवा, मध्य प्रदेश, गुजरात आणि उत्तर प्रदेश अशा ४ राज्यांतून आलेल्या या तरुणांनी आपले बिझनेस मॉडेल्स सादर केले.

### दिग्गजांची उपस्थिती आणि मार्गदर्शन

शार्क टँक इंडिया' फेम आणि 'बांबू इंडिया'चे संस्थापक योगेश शिंदे हे मुख्य पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना शाश्वत व्यवसायाचे महत्त्व पटवून दिले. एमडॉक्सचे रवींद्र पाल सिंग, गौरव त्रिपाठी (PARTEX AI) आणि डॉ. कविता पारेख यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या यशासाठी संस्थेचे विश्वस्त मा. तेजस पाटील, कॅम्पस डायरेक्टर रिअर ॲडमिरल अमित विक्रम, डायरेक्टर डॉ. शलाका पार्कर, हिरेन केसरिया (CEO, WIRRER SOLUTIONS) आणि मुख्य समन्वयक डॉ. रश्मी प्रसाद यांनी परिश्रम घेतले.

"BIZ TANK च्या माध्यमातून आम्ही विद्यार्थ्यांना केवळ व्यासपीठच नाही, तर प्रत्यक्ष गुंतवणूक आणि बाजारपेठेची संधी उपलब्ध करून दिली आहे. जागतिक दर्जाचे उद्योजक घडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत."
— **डॉ. शलाका पार्कर** (डायरेक्टर, डी. वाय. पाटील पीजीडीएम इन्स्टिट्यूट)



### विजेत्यांवर बक्षिसांची लयलूट

प्रथम क्रमांक (₹५०,०००): नंदिनी जगदाळे व अंबर येंदे (डी. वाय. पाटील पीजीडीएम, आकुर्डी). यांच्या 'ISOFLOW 4' या कल्पनेला गुंतवणूकदारांनी जागेवरच ६ लाखांचा निधी जाहीर केला.

द्वितीय क्रमांक (₹२५,०००): संजय उपाध्याय (IISER पुणे) – कल्पना: 'FIXTHIS'.

तृतीय क्रमांक (₹१५,०००): श्रद्धेय गाडेकर (AISSMS मॅनेजमेंट) – कल्पना: 'DURG'.

विशेष सन्मान: विदर्भातील एका १३ वर्षीय उद्योजकाला ₹११,००० देऊन गौरविण्यात आले. कोविड काळात पालक गमावल्यानंतरही त्याने जोपासलेली उद्योजकता सर्वांसाठी प्रेरणादायी ठरली.

# पिंपरी-चिंचवडमधील 128 नगरसेवकांना “समान न्याय” : महापौर रवि लांडगे

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड शहर वाशी यांना दररोज पाणी पुरवठा करण्याबाबत पाऊले उचलली जातील. पाणी स्वच्छता आरोग्य यावर भर दिला जाईल असे प्रतिपादन नवनिर्वाचित महापौर रवी लांडगे यांनी केले. पिंपरी-चिंचवडच्या महापौरपदी रवी लांडगे, तर उपमहापौरपदी शर्मिला बाबर यांची शुक्रवारी बिनविरोध निवड झाली. यानिमित्त पत्रकार परिषदेत महापौर लांडगे बोलत होते. महापौर पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा पत्रकारांच्या वतीने ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार सातुर्डेकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.**

यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, पक्षनेते प्रशांत शितोळे, माजी उपमहापौर राजू मिसाळ, माजी नगरसेवक राजू दुर्गे उपस्थित होते.

स्वच्छ व सुंदर शहर कसे बनवता येईल याकडे आपले लक्ष असेल. सायकल शर्यतीच्या वेळी नागरिकांचा सहभाग आणि कर्मचाऱ्यांमधील जागरूकता यामुळे शहर सुंदर झाले होते तसेच सातत्य ठेवण्याचा प्रयत्न राहील असे महापौर लांडगे यांनी सांगितले.



प्रशासकीय काळामध्ये जी चुकीची कामे झाली, भ्रष्टाचार झाला त्यांची चौकशी करणार का असे विचारले असता प्रशासकीय काळातील निर्णयांबाबत मी माहिती घेईन. भ्रष्टाचाराबाबत माझ्यापर्यंत तरी काही माहिती आलेली नाही, असे महापौर लांडगे यांनी सांगितले.

पिंपरी चिंचवड महापालिकेसाठी स्वतंत्र आयुक्त नेमण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी केली जाईल असे महापौर लांडगे यांनी सांगितले. शहरात 128 नगरसेवक आहेत त्यांच्या प्रत्येकाच्या तक्रारीची दखल घेण्याबाबत आयुक्तांना आदेश देण्यात येत असल्याचे महापौर लांडगे यांनी सांगितले. शहरातील भटक्या कुत्र्यांचा प्रश्न सोडविण्यासाठी आणखी यंत्रणा उभारली जाईल असे त्यांनी सांगितले.